जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५७१ दिनांक - २३/०७/२०२३**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## टोळी प्रमुख मयुर रंगनाथ आरडे व त्याचे इतर १० साथीदार यांचेविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक ०५/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/१५ वा.चे सुमारास फिर्यादी व त्यांचे मित्र असे लुंकड शाळेजवळ गप्पा मारत थांबले होते.त्यावेळी वस्तीत राहणारा मयुर आरडे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर १० साथीदार असे आरडा ओरडा करीत तेथे आले.त्यांचेपैकी काहीच्या हातात लाकडी दांडकी व काठया तसेच मयुर आरडे याचे हातात लोखंडी धारदार हत्यार होते.त्यांनी शिवीगाळ करून,जिवे मारण्याची धमकी देवुन,नागरीकांमध्ये दहशत निर्माण करून तेथील टपरी तसेच सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान करुन फिर्यादी यांचे मित्रास धारदार लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन खिशातील पाकीट काढुन घेतले.त्याबाबत सहकारनगर पो.स्टे.गुरनं.१५७/२०२३,भा.द.वि.कलम ३९५,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६,४२७ आर्म ॲक्ट क.४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५,क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७,सार्वजनिक संपत्ती क्षती निवारण अधि.१९८४ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१)मयुर रंगनाथ आरडे,वय २२ वर्षे रा.गल्ली नं.६० तळजाई वसाहत पद्मावती पुणे.(टोळी प्रमुख) २)ऋषीकेश ऊर्फ बारक्या संजय लोंढे,वय २३ वर्षे रा.माने गिरणी पाठीमागे तळजाई वसाहत पद्मावती पुणे ३)रोहन ऊर्फ गायसोन्या राजु आरडे,वय २१ रा.गल्ली नं.६० तळजाई वसाहत पद्मावती पुणे ४)आदित्य ऊर्फ सॅण्डी पद्माकर डाकले,वय २० वर्षे रा.विनायक हॉटेलसमोर महात्मा गांधी सोसायटी पद्मावती,पुणे ५)आकाश मनोज डाकले,वय २३ वर्षे रा. विनायक हॉटेलसमोर महात्मा गांधी सोसायटी पद्मावती पुणे ६)अनिकेत ऊर्फ गुड्डु रविंद्र शिंदे,वय २४ वर्षे रा.विनायक हॉटेलजवळ महात्मा गांधी सोसायटी पद्मावती,पुणे ७)वृषभ शंकर कांबळे,वय २३ वर्षे रा.गल्ली नं.७६ तळजाई वसाहत पद्मावती पुणे. ८) जयेश ऊर्फ जयडया दत्ता ढावरे वय १९ वर्षे रा.गल्ली नं.७ तळजाई वसाहत पद्मावती,पुणे (आरोपी क्र.१ ते ८ यांना अटक करण्यात आली आहे) व ९) एक विधी संघर्षीत बालक यास ताब्यात घेतले असुन १०)दोन विधीसंघर्षीत बालक**

गुन्हयाचे तपासा मध्ये **मयुर रंगनाथ आरडे (टोळी प्रमुख)** याने नव्याने आपली टोळी तयार केली आहे.तसेच गुन्हे घडवुन आणणे करीता विधी संघर्षीत बालकांचा मोठया प्रमाणात वापर करत असुन **मयुर रंगनाथ आरडे (टोळी प्रमुख)** हा मागील ५ वर्षा पासुन आपल्या गुन्हेगारी कारवाया करीत आहे. त्याचेवर व त्याचे साथीदारांवर प्राण घातक शस्त्र जवळ बाळगणे,सदोष मनुष्य वधाचा प्रयत्न,गंभीर दुखापत,बेकायदेशीर जमाव जमवून,लोकांमध्ये हल्ले करून,घातक शस्त्र जवळ बाळगणे,नागरीकांच्या मालमत्तेचे नुकसान करणे, आपल्या टोळी सदस्यांकडुन गुन्हे घडवुन आणणे व दहशत निर्माण करणे,पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी काढलेल्या आदेशांचा भंग करणे,गुन्हयासाठी बेकायदेशीर घातक शस्त्राचा वापर करुन दहशत निर्माण करुन तळजाई वसाहत,खंडाळे चौक,वनशिव वस्ती रोड,सहकारनगर येथील नागरीकांशी वाद करुन आपले टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमानसात दहशत राहावी हाच उद्देश ठेवुन त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीवर एकुण ०३ गुन्हे एकत्र केल्याची नोंद असुन,स्वंतत्रपणे एकुण ४ गुन्हे असे एकुण ७ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आली आहे.टोळीचा मुख्य सुत्रधार मयुर रंगनाथ आरडे याने व त्याचे संघटीत टोळीतील साथीदार यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व आर्थीक फायदयासाठी यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदया करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करणे कामी सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परि-२,पुणे, श्रीमती.स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून सहकारनगर पोलीस स्टेशन कडील गुरनं.१५७/२०२३, भा.द.वि.कलम ३९५,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६,४२७ आर्म ॲक्ट क.४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७,सार्वजनिक संपत्ती क्षती निवारण अधि. १९८४ चे कलम ३ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी पुर्वमान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर श्री.नारायण शिरगावकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त,परि-२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील,मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे, श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पो.स्टे.चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र गजेंद्र माळाळे पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप देशमाने,सर्व्हेलन्स पथकाकडील,पोलीस अंमलदार संजय गायकवाड,मंगेश खेडकर,पुजा तिडके,भाऊसाहेब आहेर,यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ३९ वी कारवाई आहे.**